**अपंग व्यक्ती अधिनियम-१९९५ मधील तरतुदीनुसार अंध व अपंग व्यक्तींना प्राधान्याने व सवलतीने जमीन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : जमीन १०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २५ जुलै, २००७.

GLND 070702

**वाचा :-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक जमीन १०९८/१५१५२४/प्र.क्र.७५/९८/ज-१, दि.२६.४.२००१.

३) शासन शुध्दिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक जमीन १०९८/१५१५२४/प्र.क्र.७५/९८/ज-१, दि.३.६.२००२.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि.२५.५.२००७.

**<u>शासन निर्णय :-</u>**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ४३ अन्वये निवासी, वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी, विशेष करमणूक केंद्र स्थापन करण्यासाठी, संशोधन केंद्रासाठी प्राधान्याने व सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करणे बंधनकारक आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार अंध व अपंग व्यक्तींना तसेच अंध व अपंगांशी संबंधित संस्थांना खालीलप्रमाणे सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| अ.क्र. | प्रयोजन | निर्णय | | |
|---|---|---|---|---|
| १ | <u>निवासी</u> | निवासी सदनिका / घरे बांधण्यासाठी, संस्थेला शासकीय जमीन मंजूर करतांना अशा प्रत्येक संस्थेने आपल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या ३% एवढे सदस्य अंध व अपंग प्रवर्ग मधून समाविष्ट करावेत. हे आरक्षण आंतरपरिवर्तनीय राहील. | | |
| २ | <u>वाणिज्यिक व औद्योगिक</u> | महानगरपालिका क्षेत्रात, तसेच महानगरपालिका क्षेत्राबाहेर, नगर पालिका / नगर परिषद क्षेत्रात, ग्रामीण क्षेत्रात | जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% इतकी कब्जेहक्काची किंमत आकारुन जमीन कब्जेहक्काने देण्यात यावी. | या ५% किंमतीवर ७.५% इतके वार्षिक भाडे आकारुन ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात यावी. |

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
4 AUG 2007

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अंध व अपंगांसाठी विशेष <u>करमणूक केंद्र स्थापन</u> करण्यासाठी | महानगरपालिका व, नगरपालिका / नगरपरिषद, ग्रामीण क्षेत्रात | कब्जेहक्काने मंजूर करण्यात येऊ नये. | शासकीय जमीन प्रचलित बाजारमुल्याच्या ५% रकमेवर ७.५% दराने भाडे आकारुन १५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यात यावी. |
| ४ | अंध अपंगांच्या <u>शाळेसाठी</u> | महानगरपालिका क्षेत्रात | जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% इतकी किंमत आकारुन <u>कब्जेहक्काने</u> देण्यात यावी. | या जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% किंमतीवर ७.५% दराने प्रतिवर्ष भाडेदराने ३० वर्षांच्या कालावधीसाठी <u>भाडेपट्टयाने</u> देण्यात यावी. |
| | | नगरपालिका / नगरपरिषद व ग्रामीण क्षेत्रात | प्राथमिक शाळांच्या इमारतीसाठी शासकीय जमीन **भोगाधिकार मुल्यरहित व सारा माफीने** दिनांक ८.२.१९८३ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार कब्जेहक्काने देण्यात यावी. | -- |
| ५ | अंध अपंगांच्या <u>संशोधन केंद्रासाठी</u> | महानगरपालिका व नगर पालिका / नगर परिषद, ग्रामीण क्षेत्रात | जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्यांच्या ५% किंमत आकारुन कब्जेहक्काने देण्यात यावी. | जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% किंमतीवर ७.५% दराने भाडे आकारुन ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यात यावी. |

२. वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी देण्यात येणारी सवलत केवळ वेतनी सेवा नसलेल्या किंवा उत्पन्नाचे अन्य पुरेसे साधन नसलेल्या अंध व अपंगांनाच लागू राहिल. उपलब्ध शासकीय जमिनीसाठी प्राप्त झालेल्या अर्जदारांमधून पात्र व गरजू अर्जदारांची निवड विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे संमतीने निश्चित करुन, जिल्हाधिकारी यांनी जागेचे वाटप करावे.

३. जर अंध व अपंग व्यक्ती,वाणिज्यिक प्रयोजनासाठी जसे, रसवंती केंद्र / टेलिफोन बुथ / झेरॉक्स सेंटर इत्यादी तत्सम जोडधंदे करणार असतील तर त्यांना २०० चौ. फूट जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम ३१ मधील तरतुदीनुसार एक खास बाब म्हणून या आदेशामध्ये नमूद केलेली सवलतीची / कब्जेहक्काची किंमत आकारुन कब्जेहक्काने किंवा सवलतीच्या दराने होणारे भुईभाडे आकारुन भाडेपट्ट्याने मंजूर करण्यात यावी.

४. अंध व अपंग व्यक्तींना विशिष्ट औद्योगिक प्रयोजनासाठी किमान (Minimum) किती क्षेत्र आवश्यक आहे, याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ / महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ अथवा शासन स्तरावरील, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अभिप्रायास अधिन राहून प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार आवश्यक इतके क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम ३१ मधील तरतुदीनुसार एक खास बाब म्हणून या आदेशामध्ये नमूद केलेली सवलतीची, कब्जेहक्काची किंमत आकारुन किंवा सवलतीच्या दराने होणारे भुईभाडे आकारुन भाडेपट्ट्याने मंजूर करण्यात यावी.

५. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम २८ मधील तरतुदीनुसार अंध व अपंग व्यक्तींना निवासी प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना असलेल्या वित्तिय अधिकारानुसार पुढील कार्यवाही करावी.

६. अंध व अपंग व्यक्तींना वाणिज्यिक / औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम ३१(५) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना असलेल्या वित्तिय अधिकारानुसार शासकीय जमीन मंजूर करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. तसेच शासकीय जमीन मंजूर करताना भोगवटादार वर्ग-२ / भाडेपट्टाधारक म्हणून नेहमीच्या अटी व शर्तींवर तसेच त्यांना योग्य वाटेल अशा अन्य अटी व शर्ती जमीन मंजुरीच्या आदेशात नमूद कराव्यात. अन्य प्रकरणात आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करावा.

७. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी जमिनीचे वाटप करताना उक्त सवलतींचा वापर निश्चितपणे अंध व अपंगांसाठी होईल याबाबत तसेच सवलतींचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग होणार नाही, याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

८. हा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.३४८/०७/व्यय-९, दि.१९.७.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. का. घरत)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रत : सर्व विभागीय आयुक्त.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व उपविभागीय अधिकारी.
सर्व अधिक्षक भूमी अभिलेख.
संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, सहकार व निबंधक सहकारी संस्था, पुणे.
विभागीय उप संचालक, नगररचना आणि इतर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (१) पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (२) नागपूर.
सर्व मंत्रालयीन विभाग
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक.
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे स्वीय सहायक
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
महसूल व वन विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव व नियंत्रण अधिकारी,
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग (निवडनस्ती).

**सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन देण्याच्या संबंधातील धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
शासन पूरकपत्र क्रमांक : जमीन १०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २५ जुलै, २००७.

**वाचा :-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि.२५.५.२००७.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दि.९.७.१९९९.

**<u>पूरकपत्र :-</u>**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ४३ अन्वये अंध / अपंगांना निवासी प्रयोजनासाठी आरक्षणाची सवलत देण्याकरीता शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांना गृहबांधणीसाठी शासकीय जमीन देण्याबाबतच्या शासन निर्णय क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दिनांक २५.५.२००७ च्या परिच्छेद क्रमांक १० मध्ये खालीलप्रमाणे १०(अ) परिच्छेद समाविष्ट करण्यात यावा.

<u>१०(अ)</u> :- "सहकारी गृहनिर्माण संस्थांना निवासी सदनिका / घरे बांधण्यासाठी शासकीय जमीन मंजूर करताना अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्य संख्येच्या ३% एवढे सदस्य अंध व अपंग प्रवर्गामधून समाविष्ट करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अंध - अपंग सदस्य आरक्षित अथवा अनारक्षित प्रवर्गापैकी असू शकतात. यापुढे शासकीय जमिनीवरील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत ही अट अनिवार्य राहील."

हे शासन पूरकपत्र सामाजिक न्याय विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३४८/०७/व्यय-९, दि.१९.७.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. का. घरत)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रत : सर्व विभागीय आयुक्त.